# राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे.



# राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा

**सन**

**२०२३-२०२४**

## स्पर्धा गट-पूर्व प्राथमिक गट

**नवोपक्रमाचे नाव :- सद्यस्थितीत भारत केंद्रित आदर्श नागरिक घडविण्यासाठी संस्कारांची आवश्यकता आणि त्यासाठी शाळेचे योगदान.**


**नवोपक्रमकर्त्या शिक्षकाचे नाव :- सौ. अस्मिता धर्मराज ठिकणे.**

**पत्ता** :- मु.पो.अ.लाट, पाटील नगर -४१६१४३ ता.शिरोळ, जि. कोल्हापूर.

E-MAIL ID :- thikaneasmita@gmail.com

**मो.क्र.:- ८६९८८३२८६६**

**शाळेचे नाव** :- **सेवा भारती संचलित, माधव शिशु मंदिर, इचलकरंजी.**

**पत्ता** :- वार्ड.नं. २२, घर नं. ५३ / १, हातकणंगले रोड,

स्टेशन नाक्याजवळ, गणेशनगर – इचलकरंजी – ४१६११५. ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर.

Udise No. २७३४०३०८५०८






# अनुक्रमणिका


| अ.क्र. | नवोपक्रम तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | नवोपक्रम कर्त्याचा परिचय | ०१ |
| २ | प्रतिज्ञापत्र | ०२ |
| ३ | प्रमाणपत्र | ०३ |
| ४ | प्रास्ताविक | ०४ |
| ५ | नवोपक्रम शीर्षक | ०५ |
| ६ | नवोपक्रमची गरज, महत्व, वेगळेपण व फायदे | ०६ |
| ७ | नवोपक्रमाची उद्दिष्टे | ०९ |
| ८ | नवोपक्रमाचे नियोजन | १० |
| ९ | नवोपक्रमाची  कार्यपद्धती | ३१ |
| १० | नवोपक्रमाची यशस्विता | ३७ |
| ११ | समारोप | ३९ |
| १२ | संदर्भ व परिशिष्टे | ४० |

# नवोपक्रम कर्त्याचा परिचय



**नाव :-** सौ. अस्मिता धर्मराज ठिकणे

**जन्म ता :-** २५ मे १९८६

**मो.नं. :-** ८६९८८३२८६६

**E-Mail ID :-** thikaneasmita@gmail.com

**कायमचा पत्ता :-** मु.पो. अब्दुललाट, पाटील नगर, ता.शिरोळ, जि. कोल्हापूर,
पिन को. ४१६१४३.

**शैक्षणिक अर्हता :-** HSC, D.El.Ed.

**अनुभव :-** हंगामी साखर शाळा ९ वर्षे.
सुकन्या किशोरी प्रकल्प ३ वर्षे.
माधव शिशु मंदिर १३ वर्षे.

**शाळेचे नाव :-** सेवा भारती संचलित माधव शिशु मंदिर, इचलकरंजी.

**पद :-** मुख्याध्यापिका

**नवोपक्रम विषय :-** सर्वांगीण विकास.

**शीर्षक :-** सद्यस्थितीत भारत केंद्रित आदर्श नागरिक घडविण्यासाठी संस्कारांची आवश्यकता आणि त्यासाठी शाळेचे योगदान.

**गट :-** पूर्व प्राथमिक गट.

# प्रतिज्ञापत्र

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीम/डॉ. सौ. अस्मिता धर्मराज ठिकळे. प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला सद्य: स्थितीत भारतकेंद्रीत आदर्श नागरिक घडवण्यासाठी संस्कारांची आवश्यकता त्यासाठी शाळेचे योगदान हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : 24/11/2023

स्थळ : इचलकरंजी


स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव : सौ. अस्मिता ठिकळे.

शाळेचा / कार्यालयाचा शिक्का.

माधव शिशु मंदिर
इचलकरंजी

# प्रमाणपत्र



प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीम/डॉ. सौ. अस्मिता धर्मराज ढिकणे हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला सद्यस्थितीत भारतकेंद्रीत आदर्श नागरिक घडविण्यासाठी संस्काराची आवश्यकता, यासाठी शाळेचे योगदान हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष --------- मध्ये त्यांनी स्वतः राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : 24/11/2023

स्थळ : इचलकरंजी.

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

नाव :............................................

शिक्का:

सेवा भारती - शिक्षण समिती करिता,

समिती सदस्य. समिती अध्यक्ष.

# प्रास्ताविक

आदरणीय मान्यवर ;

सस्नेह वंदे।

माझा नवोपक्रम आपणासमोर सादर करण्यापूर्वी माझे मनोगत, माझे दोन शब्द आपणासमोर मांडू इच्छिते.

शिक्षण आणि संस्कार दोन्हीही मानवी जीवनातील अत्यावश्यक गोष्टी आहेत संस्कार जीवनाची पायाभरणी मजबूत करतात व शिक्षणामुळे मानवी जीवनाची उत्तुंग इमारत उभी राहणे शक्य होते. जीवनाची गाडी सार्थकतेच्या दिशेने जायचे असेल तर तिला शिक्षण आणि संस्कार या दोन्ही चाकांची गरज आहे .शिक्षण या शब्दाच्या व्यापक अर्थाकडे पाहून विचार केला तर शिक्षणातून संस्कार होतात असा आभास होतो व संस्कारातूनही शिक्षण होत असल्याची जाणीव होते. *"शिला शिवाय विद्या फुकाची आहे."* या एकाच वाक्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण आणि संस्कार या दोन्ही गोष्टीतील अद्वितीय संबंध स्पष्ट केला आहे. जिजाऊने शिवाजी महाराजांना रामायण व महाभारतातले धडे शिकवले व न्यायनितीच्या शिक्षणाबरोबरच स्वदेश प्रेमाचा संस्कार केला. कर्मवीरांनी अनेक मुलांना शिक्षण दिले पण, शिक्षणाबरोबरच स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद असा श्रमप्रतिष्ठेचा संस्कारही दिला. शाहूंनी शिक्षणाबरोबरच कला व संस्कृतीचा वसा कोल्हापूरच्या मातीला बहाल केला अशा प्रकारे संस्कार हे शिक्षणाबरोबरच जगण्यासाठी परावर्तित होत असतात.

आई ही मुलाची पहिली गुरु असते व तीच संस्काराची गाथा असते मुलांच्या इवल्याश्या हाताला धरून त्याला चालायला शिकवणाऱ्या मातेने आपल्या मुलाला जीवनाच्या मार्गावरून चालताना उपयोगी पडतील असे संस्कार दिले पाहिजेत. शालेय शिक्षणातून माणसाच्या जीवनाला आकार यावा व तो एक आदर्श भारतीय नागरिक म्हणून घडावा अशी सार्थ अपेक्षा आहे आणि म्हणूनच शालेय शिक्षणाच्या शिक्षणातून विद्यार्थ्यांमध्ये संस्कार होणे अभिप्रेत आहे. शाळेच्या परिपाठातून चांगले विचार आणि सदाचाराचा संस्कार होतो. इतिहासाच्या पानापानातून राष्ट्रभक्तीचा संस्कार होतो भाषा विषयातून अभिव्यक्तीचा आणि गणितातून व्यवहारी वृत्तीचा संस्कार होतो म्हणूनच शिक्षकाने शिक्षणाच्या प्रवाहाबरोबरच बालकांना संस्काराची देण बहाल करावी. शालेय शिक्षणाबरोबरच मानवी जीवनाशी संबंधित समाजातील अनेक गोष्टी मानवी मनावर परिणाम करतात संस्कारांचा वसा व शिक्षणाचा ठसा उमटलेल्या मनुष्याने कुसंस्कारापासून आपल्या मनाचा कानाकोपरा दूर ठेवावा उच्चशिक्षित तरुण आज समाजामध्ये विधायक कृत्य करत असताना दिसतात. म्हणूनच व्यवहारिक शिक्षणाला आज संस्कारांची जोड देणे गरजेचे आहे तसे झाल्यास शिक्षणाचा मूळ उद्देश साध्य होईल व मानवी जीवन सफल होईल आणि म्हणूनच बालवाडी पासूनच मुलांच्या वर योग्य ते संस्कार करणे आवश्यक आहे. यासाठी आम्ही शाळेमध्ये ***सद्यस्थितीत भारत केंद्रित आदर्श नागरिक घडवण्यासाठी संस्कारांची आवश्यकता आणि त्यासाठी शाळेचे योगदान*** हा नवोपक्रम राबवत आहोत.

नवोपक्रम शीर्षक

# सद्यस्थितीत भारत केंद्रित आदर्श नागरिक घडविण्यासाठी संस्कारांची आवश्यकता आणि त्यासाठी शाळेचे योगदान

# नवोपक्रमाची गरज, महत्व, वेगळेपण व फायदे

## गरज :-

१) 0 ते 6 वयोगटातील बालके ही अनुकरणप्रिय असतात. वाईट गोष्टी त्यांच्या निदर्शनास आल्या की ते लगेचच त्याचे अनुकरण करतात असे होऊ नये म्हणून चांगल्या व वाईट गोष्टींची बालकांना ओळख करून देणे गरजेचे आहे म्हणूनच शाळेमध्ये उपक्रमातून बालकांना चांगल्या गोष्टींचे ज्ञान देऊन त्यांच्यावर संस्कार करण्याची गरज आहे.

२) सद्यस्थिती पाहता असे दिसून येते की, काही बालकांच्या मनात मोठ्यांविषयी आदर नाही मोठ्या माणसांशी उद्धटपणाने बोलतात ही परिस्थिती बदलायची असेल तर शाळेमध्ये मुलांनी मोठ्यांशी कसे वागावे याचे संस्कार देणे आवश्यक आहे.

३) बालके स्वतःचा डबा संपूर्ण संपवत नाहीत डब्यातील अन्नाला नावे ठेवतात, शिक्षकांची नजर चुकवून ते बाहेर फेकतात किंवा कचरापेटीत टाकतात अशा वेळेला अन्नाचे महत्त्व त्यांना पटवून देण्याची गरज आहे व अन्न वाया जाऊ न देण्याचे संस्कार करणे ही गरजेचे आहे.

४) समाजामध्ये वावरत असताना असे दिसून येते की, अनेक लोकांमध्ये कृतज्ञता व्यक्त करण्याची भावना नाही म्हणूनच लहानपणापासूनच बालकांमध्ये आपल्याला मदत करणाऱ्या व्यक्तींचे व समाजात चांगले काम करणाऱ्या व्यक्तींचे आभार माणून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचे संस्कार शाळेमध्ये देणे गरजेचे आहे.

५) रस्त्यावरून प्रवास करताना अनेक लोक वाहतूकीचे नियम मोडताना दिसून येतात सोबत त्यांच्या लहान बालके असतात नकळतपणे ती बालके हे सर्व पाहत असतात त्यांच्यावर असे संस्कार होऊ नये म्हणून वाहतूकीच्या नियमांची ओळख करून देऊन वाहतूकीच्या नियमांचे पालन करण्याचे संस्कार बालकांना देणे आवश्यक आहे.

६) सद्यस्थिती पाहता सर्वत्र प्राणी व पक्षी यांचे प्रमाण खूपच कमी होत आहे याची जाणीव ठेवून लहानपणापासूनच बालकांच्या मनात प्राणी व पक्षी यांच्या विषयी सहानुभूती निर्माण करण्याची गरज आहे म्हणून प्राणी व पक्षी यांच्यावर प्रेम करण्याचे संस्कार मुलांना आत्तापासूनच देणे अत्यावश्यक आहे.

७) देशभक्ती व देशप्रेम लहानपणापासूनच बालकांच्या मध्ये निर्माण करणे अत्यंत आवश्यक बाब आहे कारण पुढे जाऊन हेच देशाचे आदर्श नागरिक घडणार आहेत.

८) वर्गात शिकवत असताना असे निदर्शनास आले की, काही बालके शिवीगाळ करतात व अपशब्द उच्चारतात अशा बालकांना शाळेमध्ये संस्कार देणे खूपच गरजेचे आहे.

## महत्व :-

बालकांच्या आयुष्याची पहिली सहा वर्ष ही अत्यंत महत्त्वाचे असतात. याच काळामध्ये त्यांच्या भावी जीवनाची पायाभरणी होते व शारीरिक, भाषिक, बोधात्मक, सामाजिक आणि भावनिक या क्षमतांचा विकास होत असतो. व्यक्तीच्या जीवनातील इतर कोणत्याही टप्प्यातील विकासाच्या गतीपेक्षा या सहा वर्षाच्या

कालावधीमध्ये मेंदूच्या विकासाची गती ही अधिक वेगवान असते मेंदूशास्त्रामधील संशोधनानुसार व्यक्तीच्या मेंदूचा ८५% पेक्षा जास्त विकास वयाच्या सहाव्या वर्षापर्यंत होतो. प्रारंभिक बाल्यावस्थेतील सुजाण संशोधनाचे महत्त्व मेंदू शास्त्राने अधोरेखित केले आहे. बालकांच्या जीवनातील सुरुवातीच्या वर्षांमध्ये सुजाण संगोपन मिळाल्यास त्याच्या मेंदूचा निकोप व चिरंतन विकास होतो असे अनेक संशोधनाच्या निष्कर्षातून सिद्ध झाले आहे. म्हणूनच बालकांच्या वर चांगले संस्कार करून त्यांना भावी आयुष्यामध्ये एक आदर्श नागरिक म्हणून ते समाजात व्यवहार करू शकतील अशा दृष्टिकोनातून शाळेमध्ये बालकांना संस्काराचे शिक्षण देणे खूपच महत्त्वाचे आहे असे मला वाटते.

अशाप्रकारे प्रारंभिक बाल विकास सुधारण्यासाठीचे प्रयत्न हा एक खर्च नाही तर ती एक गुंतवणूक आहे, दर्जेदार प्रारंभिक शिक्षणामधील गुंतवणूक ही राष्ट्राच्या दीर्घकालीन आर्थिक विकासाला चालना देते असे राज्य अभ्यासक्रम आराखडा 2023 पायाभूत स्तर यामध्ये नमूद केले आहे व ते शंभर टक्के बरोबर आहे असे मला वाटते.

सध्याची स्थिती पाहता असे लक्षात येते की, सध्याची पिढी ही धावपळीच्या युगात अडकली आहे त्यामुळे प्रत्येक जण फक्त स्वतःमध्ये गुंतलेला आहे इतर कोणाचीही या पिढीला पर्वा नाही बाहेरील लोकांचेच काय तर घरामध्ये आई-वडिलांची सुद्धा या पिढीला पर्वा नाही. आई-वडील हे देवा समान असतात. भारतीय या विचारसरणीला आत्ता तडा जात आहे म्हणूनच लहान वयापासूनच बालकांनी आपल्या आई-वडिलांवर प्रेम करावे हे संस्कार शाळेत देणे अत्यंत आवशक आहे त्याचबरोबर या बालकांच्या पालकांनी आपल्या आई-वडिलांना वेळ देणे व त्यांची काळजी घेणे हे ही महत्त्वाचे आहे कारण बालके पालकांचे अनुकरण करत असतात म्हणून आई-वडिलांची सेवा करणे  हेच संस्कार बालक व पालकांवर व्हावेत हा या उपक्रमाचा महत्त्वाचा टप्पा आहे.

## वेगळेपण :-

१)शून्य ते सहा वयोगटातील बालकाचा विचार जर आपण केला तर या वयातील बालके स्वतः जवळची कोणतीही वस्तू दुसऱ्याला देत नाहीत सर्व काही त्याला स्वतःलाच हवे असते आणि हे बालकाचे स्वभाव वैशिष्ट्य आहे दुसऱ्याला देण्याची भावना बालकांमध्ये निर्माण करण्यासाठी इतरांना मदत करणे हा उपक्रम शाळेमध्ये घेण्यात आला यामुळे गरजू लोकांना मदत करण्याची भावना बालकांच्या मनामध्ये निर्माण झाली म्हणजेच वर्गात एखाद्याकडे पेन्सिल नसेल तर पेन्सिल देणे किंवा एखाद्या बालकाने डबा आणला नसेल तर त्याला आपल्या डब्यातील खाऊ देणे इत्यादी .थोडक्यात, सांगायचे झाले तर दुसऱ्याला देण्याची भावना बालकांच्या मनामध्ये निर्माण झाली.

२) घर हेच एक मोठे विद्यापीठ आहे या विचाराने गृह विद्यापीठ नावाचा उपक्रम घेण्यात आला यामध्ये संस्कारांशी निगडित उपक्रम मुलांना घरी करण्यास देण्यात आले. यातील काही उपक्रम खालील प्रमाणे

१) रोज शुभंकरोती म्हणणे.

२) घरातील सर्व मोठ्यांशी आदराने वागणे .

३) अन्नाचा आदर करणे.

४) मोठ्यांनी सांगितलेली कामे ऐकणे.

५) घरातील कामांमध्ये आईला मदत करणे .

६) पाणी व वीज जपून वापरणे.

३) गांधी जयंती निमित्त स्वच्छता बांधवांचा बालक, पालक व शिक्षक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

४) चंद्रयान ३ यशस्वीरित्या चंद्रावर उतरले आपल्या देशासाठी ही खूपच अभिमानाची गोष्ट आहे हा देशाविषयीचा अभिमान बालकांच्या मनातही नेहमी असावा या उद्देशाने चंद्रयान ३ चे प्रक्षेपण प्रत्यक्ष उपक्रमातून बालकांसमोर सादर करण्यात आले व चंद्रयान विषयी माहिती बालकांना देण्यात आली.

५) शाळेमध्ये झाडांचा वाढदिवस साजरा करण्यात आला या दिवशी झाडांचे पूजन करून त्यांना हसरे मुखवटे लावण्यात आले व यानंतर बालकांना झाडाचे महत्व सांगण्यात आले.

६) रक्षाबंधन हा बहीण भावाचा सण आहे पण आम्ही यावर्षी शाळेमध्ये आपले रक्षण करणाऱ्या पोलिसांना राखी बांधली त्याचबरोबर आपल्या आरोग्याची काळजी घेऊन आपले रक्षण करणाऱ्या डॉक्टरांना राखी बांधली यावर्षीच्या रक्षाबंधनाचा सण आम्ही शाळेमध्ये पोलीस व डॉक्टर यांच्यासोबत साजरा केला यातून बालकांना डॉक्टर व पोलीस यांच्या विषयी आपुलकी वाटू लागली.

## फायदे :-

१ शाळेतील संस्कारक्षम उपक्रमामुळे मुले घरी जाऊन रोज मोठ्यांना नमस्कार करू लागली त्यामुळे पालकांना आनंद झाला व मोठ्यांचा आदर करण्याची भावना बालकांच्या मनामध्ये रुजली.

२ घेतलेल्या उपक्रमाविषयी मुले घरी जाऊन सांगू लागली त्यामुळे पालकांना शाळेतील शिक्षणाबरोबरच संस्कारांचे महत्त्व पटले बालकांच्या मनात इतरांना मदत करण्याची भावना निर्माण झाली घरी जाऊन आपल्या बहिण भावांसोबत बालके खेळणी वाटून खेळू लागली.

३ पक्ष्यांना खाऊ देणे या उपक्रमामुळे पक्ष्यांविषयी व प्राण्यांविषयी बालकांच्या मनामध्ये प्रेम निर्माण झाले.

४ शून्य ते सहा वयोगटातील बालकांचे अनुकरण हा एक प्रिय गुणधर्म आहे त्यामुळे ते घेतलेले उपक्रमांचे अनुकरण करू लागले.

५ वाहतुकीचे नियम पाळणे या उपक्रमामुळे बालक पालकांना सिग्नल मोडण्यापासून थांबवत होते कारण शाळेमध्ये वाहतुकीचे नियम पाळणे या उपक्रमांतर्गत बालकांना थांबा, पुढे जा ,वाट पहा व झेब्रा क्रॉसिंग अशी चिन्हे शाळेमध्ये शिकवली होती.

# नवोपक्रमाची उद्दिष्टे

१) देशाचा आदर्श नागरिक घडवणे.

२) शाळेतील बालकांना संस्कारक्षम बनवणे.

३) नेहमी खरे बोलण्याचे संस्कार देणे.

४) बालकांच्या मनात देण्याची भावना निर्माण करणे.

५) स्वावलंबी होण्याचे संस्कार करणे.

६) बालकांचा सामाजिक विकास करणे .

७) वृक्षांची काळजी घेण्याचे संस्कार करणे.

८) पालक व बालक यांच्यामध्ये देशभक्ती निर्माण करणे .

९) समाजात चांगले काम करणाऱ्या व्यक्तींचे आभार मानण्याचे संस्कार करणे.

१०) बालक व पालक यांच्या मनामध्ये देशाविषयी अभिमान निर्माण करणे.

११) आजचे बालक हे उद्याचे आदर्श नागरिक आहेत ही भावना पालकांच्या व अन्य शिक्षकांच्या मनात रुजवणे.

१२) प्रत्येक सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमात बालकांचा सहभाग घेणे.

१३) वाहतुकीच्या नियमांची प्राथमिक ओळख करून देणे.

१४) जेवताना रोज भोजन मंत्र म्हणण्याचे संस्कार करणे.

१५) पक्ष्यांना रोज खाऊ देण्याचे संस्कार करणे .

१६) पाणी व वीज बचत करण्याचे संस्कार देणे.

१७) इतरांना मदत करण्याचे संस्कार देणे.

१८) आई-वडिलांविषयी बालकांच्या मनामध्ये प्रेम व आदर निर्माण करणे.

१९) अन्नमय कोश, प्राणमयकोश, मनोमयकोश,विज्ञानमयकोश व आनंदमयकोश या पंचकोशांचाविकास करणे.

# नवोपक्रमाचे नियोजन

१५ जून २०२३ पासून ७ नोव्हेंबर २०२३ पर्यंत सद्यस्थितीत भारत केंद्रित आदर्श नागरिक घडवण्यासाठी संस्कारांची आवश्यकता आणि त्यासाठी शाळेचे योगदान हा नवोपक्रम घेण्यात आला या उपक्रमासाठी मोठ्या गटातील ५५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

## १) उपक्रमपूर्व स्थितीचे निरीक्षण :-

१) काही बालकांना शाळेविषयी आवड नव्हती.
२) काही बालके शिक्षकांशी आदराने बोलत नव्हती.
३) काही बालके शिवीगाळ करत होती.
४) काही बालकांना वस्तू न सांगता घरी घेऊन जाण्याची सवय होती.
५) काही पालकांना सिग्नल मोडताना स्वतः पाहिले होते.
६) प्रत्यक्ष पालक गृहभेटीदरम्यान घरचे वातावरण फारसे बरे नसल्याचे जाणवले.
७) नोकरीनिमित्त जे आई वडील बाहेर असतात अशा काही बालकांना टीव्ही व मोबाईल या गोष्टींचा आधीन गेल्याचे जाणवले.
८) काही पालकांचे आपल्या पाल्यांकडे लक्ष नसल्याचे जाणवले.
९) बालकांमध्ये एकाग्रता नव्हती.
१०) घरातील भांडणांविषयी काही बालके शाळेत चर्चा करत होती.
११)घरामध्ये साजरे होणारे सण समारंभ यातील कामांमध्ये बालकांचा सहभाग घेतला जात नसावा.
१२)खेळणीने खेळत असताना एकमेकांना देण्याची भावना काही बालकांमध्ये नव्हती.
१३) जेवणापूर्वी भोजन मंत्र बालकांना म्हणता येत नव्हते.
१४) स्वतःचे चप्पल व दप्तर व्यवस्थित ठेवता येत नव्हते.

## २) संबंधीत व्यक्तीशी चर्चा :-

शिशु शिक्षण हा काही मनोरंजनाचा विषय नाही तसेच तो औपचारिक शिक्षणाचाही विषय नाही ते संस्काराचे क्षेत्र आहे. जीवन विकासाचा पाया आहे. संपूर्ण जीवनामध्ये हा महत्त्वाचा कालखंड आहे म्हणूनच या विषयाचा गांभीर्याने विचार केला पाहिजे व्यक्तित्व म्हणजे काय? व्यक्तिमत्व विकास काय आहे? विकासाची प्रक्रिया काय आहे? संस्कार कशाला म्हणतात? संस्कार कसे होतात? या सर्व बाबी खूपच महत्त्वाच्या आहेत आणि हे त्याचबरोबर बालकांमध्ये लहानपणापासूनच आदर्श नागरिकाचे सर्व गुण असणे अत्यंत आवश्यक आहे आणि म्हणूनच शाळेच्या मुख्याध्यापिका मा. सौ. स्वाती शिंदे मॅडम, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा.श्री. पांडूरंग धोंडपुडे सर, शाळेचे संचालक मा. श्री. प्रकाश गणपुले सर, मा .श्री. नरेंद्र कुलकर्णी सर, मा. श्री. पंकज मेहता सर शाळेच्या संचालिका मा.सौ.स्वाती कुलकर्णी मॅडम, मा. सौ. दिपाली फडके मॅडम त्याचबरोबर मा. श्री .राजेंद्र आलोणे सर, मा.श्री.महादेवराव जोगळेकर सर ,मा.श्री.डॉ.होसिंगसर यांच्याशी चर्चा करून शाळेमध्ये सद्यस्थितीत भारत केंद्रित आदर्श नागरिक घडवण्यासाठी संस्काराची आवश्यकता आणि त्यासाठी शाळेचे योगदान हा उपक्रम घेण्याचे ठरले व त्याप्रमाणे नियोजन करून उपक्रम घेण्यास सुरुवात केली.

## ३) तज्ञ मार्गदर्शन

सद्यस्थितीत भारत केंद्रित आदर्श नागरिक घडवण्यासाठी संस्कारांची अवश्यकता आणि त्यासाठी शाळेचे योगदान या नवोपक्रमासाठी सेवाभारतीचे अध्यक्ष मा.श्री.भगतरामजी छाबडा सर , मा. श्री. विनायकजी विठ्ठल गद्रे सर, मा. सौ. विनया विनायक गद्रे मॅडम, मा.श्री .प्रमोदजी मिराशी सर ,मा.श्री. पांडूरंगजी धोंडपुडे सर, मा. श्री. प्रकाशजी गणपुले सर , मा.श्री नरेंद्रजी कुलकर्णी सर, मा. श्री .पंकजजी मेहता सर व मा. श्री राजेंद्रजी अलोणे सर यांचे उत्तम असे मार्गदर्शन लाभले.

## ४) आवश्यक साधनांचा विचार :-

1) सद्यस्थितीत भारत केंद्रित आदर्श नागरिक घडवण्यासाठी संस्कारांची आवश्यकता व त्यासाठी शाळेचे योगदान या उपक्रमाचे नियोजन केले.

2) उपक्रमांमध्ये घेणाऱ्या उपक्रमांची यादी तयार केली.

3) उपक्रमासाठी मोठ्या गटाची निवड केली.

4) शाळेच्या संचालकांशी उपक्रमांविषयी चर्चा केली.

५) संस्काराचे महत्त्व पटवून देण्यासाठी पालक सभा घेण्यात आल्या.

6) उपक्रमासाठी लागणाऱ्या व्यक्तींची निवड करण्यात आली.

## ५) कार्यवाहीचे टप्पे :-

**जून २०२३**

| अ.क्र. | दिनांक | उपक्रम |
|---|---|---|
| १ | १५ जून ते २४ जून | बालकांचे निरिक्षण |
| २ | २६ जून ते ३० जून | प्रत्यक्ष गृहभेटी |

**जुलै २०२३**

| अ.क्र. | दिनांक | उपक्रम | झालेले संस्कार |
|---|---|---|---|
| १ | ०१/०७/२०२३ | आमचा गणू गोष्ट सांगणे. | स्वच्छतेचे संस्कार झाले, नीटनेटकेपणा मूल्य रुजले. |
| २ | ०३/०७/२०२३ | स्वत:ची ओळख सांगणे. | स्वत:चे नाव सांगण्याचे संस्कार झाले, भाषिक विकास झाला. |
| ३ | ०५/०७/२०२३ | बी रूजवणे व झाडांचा वाढदिवस करणे. | मातीशी नाते जोडले, शेतकऱ्याविषयी माहिती मिळाली,शारीरिक विकास झाला,अन्नमय कोशाचा विकास झाला. |
| ४ | ०८/०७/२०२३ | शुभंकरोती पठन. | एकाग्रतेचे संस्कार झाले. |
| ५ | १०/०७/२०२३ | मातृपूजन . | आईवर प्रेम करण्याचे संस्कार झाले. |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | १४/०७/२०२३ | ॐ उच्चारण व मौन. | एकाग्रतेचे संस्कार झाले, प्राणमय कोशाचा विकास झाला. |
| ७ | १८/०७/२०२३ | योगासने. | पंचकोशांचा विकास झाला, उत्तम आरोग्याचे संस्कार झाली. |
| ८ | २०/०७/२०२३ | रांगेत उभे राहणे. | शिस्तीचे पालन करणे, सुचना पाळणे. |
| ९ | २२/०७/२०२३ | भोजनमंत्र पठन . | अन्नाविषयी आदर भावना निर्माण झाली. |
| १० | २४/०७/२०२३ | वनसंवर्धन दिन. | झाडांविषयी आपुलकी निर्माण झाली. |
| ११ | २७/०७/२०२३ | वर्गात ओळीत बसणे. | शिस्तीचे पालन करणे. |
| १२ | ३०/०७/२०२३ | मोठ्या व्यक्तींचे आदर ( गोष्ट ) | मोठ्या व्यक्तींचे आदर करावे संस्कार झाले. |

## ऑगस्ट २०२३

| अ.क्र. | दिनांक | उपक्रम | झालेले संस्कार |
|---|---|---|---|
| १ | ०३/०८/२०२३ | पाणी वाचवा (माहिती देणे). | पाण्याचे महत्व समजले |
| २ | ०७/०८/२०२३ | पालक सभा. | बालकांवर होणाऱ्या संस्काराचे महत्त्व पालकांना पटले . |
| ३ | १०/०८/२०२३ | देशभक्तीपर घोषणा. | देशाविषयी अभिमान निर्माण झाले, भाषिक विकस झाला. |
| ४ | ११/०८/२०२३ | समुहगीत गायन. | गायन कला प्राप्त झाले, एकत्रित गायनाचे संस्कार झाले, सामाजिक विकास झाला, भाषिक विकास झाला. |
| ५ | १२/०८/२०२३ | नेत्यांची ओळख (विद्यार्थी वेशभूषा) | थोर नेत्यांची ओळख झाली. |
| ६ | १५/०८/२०२३ | १५ ऑगस्ट मनोगत. | स्वातंत्र्य दिनाविषयी माहिती झाली व देशभक्ती निर्माण झाली. |
| ७ | १८/०८/२०२३ | इतरांना मदत करणे( नाट्टीकरण). | मदत करण्याचे संस्कार झाला, सामाजिक विकास झाला, पंचकोशाचा विकास झाला. |
| ८ | १९/०८/२०२३ | वाहतूकीच्या नियमांचे ओळख. | वाहतूकीच्या नियमांची प्राथमिक ओळख झाली व वाहतूकीचे नियम पाळण्याचे संस्कार झाले. |
| ९ | २२/०८/२०२३ | बागेची स्वच्छता. | स्वच्छतेचे संसंस्कार झाले, पंचकोशांचा विकास झाला, शारीरिक विकास झाला. |
| १० | २६/०८/२०२३ | चंद्रयान ३ प्रात्यक्षिक. | देशाविषयी अभिमान निर्माण झाले, देशभक्ती निर्माण झाले. |
| ११ | ३१/०८/२०२३ | रक्षाबंधन. | समाजात चांगले काम करणाऱ्या व्यक्तींविषयी आदर व आपलेपणा व्यक्त करण्याचे संस्कार झाले. |

## सप्टेंबर २०२३

| अ.क्र. | दिनांक | उपक्रम | झालेले संस्कार |
|---|---|---|---|
| १ | ०१/०९/२०२३ | गणपती आरती गायन (दररोज घेण्यात आले) | आरती एकत्रित म्हणण्याचे कोशल्य प्राप्त झाले. नवीन शब्दांची ओळख झाली . |
| २ | ०३/०९/२०२३ | गणपती स्तोत्र पठण (दररोज घेण्यात आले) | भाषिक विकास झाला, गणपती बाप्पाच्या अनेक नावांची ओळख झाली. |
| ३ | ०४/०९/२०२३ | फुलांचे हार करणे. | फुलांची ओळख झाली, डोळ्यांच्या व हातांच्या क्षमतांचा विकास झाला, एकत्रित काम करण्याचे संस्कार झाले. |
| ४ | ०५/०९/२०२३ | शिक्षकदिन. | नेतृत्व गुण प्राप्त झाले. |
| ५ | ०८/०९/२०२३ | दुर्वा निवडणे. | नेत्र व हस्त समन्वय झाले, सणांच्या तयारीचे संस्कार झाले, समूह भावना वाढीस लागली. |
| ६ | ०९/०९/२०२३ | मोदक करणे. | हातांच्या क्षमतांचा विकास झाला, पौष्टीक खाद्य पदार्थाचे व त्या चवीची ओळख झाली. |
| ७ | १२/०९/२०२३ | गणपतीची सजावट करणे. | कल्पनाशक्तीचा विस्तार झाला, कामात गुंतण्याचे संस्कार झाले. |
| ८ | १५/०९/२०२३ | गणपती बापाची गोष्ट सांगणे. | गणपती बापा विषयी माहिती झाली, ऐकण्याची क्षमता विकसित झाली. |
| ९ | १८/०९/२०२३ | गणेशोत्सव साजरा करणे. | भारतीय सण साजरे करण्याचे संस्कार झाले. |
| १० | २५/०९/२०२३ | पसायदान पठन (दररोज घेण्यात आले) | भाषिक विकास झाला, एकाग्रता वाढली, बसण्याची क्षमता प्रांत झाली. |

## ऑक्टोबर २०२३

| अ.क्र. | दिनांक | उपक्रम | झालेले संस्कार |
|---|---|---|---|
| १ | ०३/१०/२०२३ | स्वच्छता बांधवांचा सत्कार करणे. | चांगले काम करणाऱ्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचे संस्कार झाले, सामाजिक विकास झाला. |
| २ | ०४/०५/२०२३ | स्वदेशी वस्तूंची खरेदी (पालकांसाठी उपक्रम) | देशाविषयी प्रेम व आपुलकीची भावना निर्माण झाली, सामाजिक विकास झाला. |
| ३ | ०५/१०/२०२३ | खादी कपडे परिधान पालक व बालकांसाठी उपक्रम. | सुती कपडयांचे फायदे पालकांना समजले. |
| ४ | ०६/१०/२०२३ | प्लॅस्टीक वापर टाळणे पालकांसाठी उपक्रम. | प्रदुषण कमी करण्याचे संस्कार झाले, प्लॅस्टीकचे नुकसान पालकांच्या लक्षात आले. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | ०९/१०/२०२३ | टपाल दिन. | पोस्ट व पोस्टमनची ओळख झाली, आनंदमय कोशाचा विकास झाला. |
| ६ | १२/१०/२०२३ | पक्ष्यांना खाऊ देणे. | पक्ष्यांनविषयी बालकांच्या मनात आत्मियता निर्माण झाली. |
| ७ | १६/१०/२०२३ | सार्वजनिक वस्तूंची काळजी घेणे. | सार्वजनिक वस्तूंची काळजी घेण्याचे संस्कार झाले. |
| ८ | १९/१०/२०२३ | वीज वाचवणे. | वीज वाचवण्याचे संस्कार झाले, बचतीचे संस्कार झाले. |
| ९ | २३/१०/२०२३ | स्वावलंबी होणे. | स्वतःचे काम स्वतः करण्याचे संस्कार झाले. |
| १० | २४/१०/२०२३ | वाती वळणे. | हातांच्या क्षामतांचा विकास झाला, डोळ्यांच्या क्षमतांचा विकास झाला, पंचकोशांचा विकास झाला, दिवाळी सणात सहभागी होण्याचे संस्कार झाले. |
| ११ | २६/१०/२०२३ | तोरण करणे. | ज्ञानेंद्रियांचा विकास झाला, पंचकोशांचा विकास झाला, एकत्र काम करण्याचे संस्कार झाले. |
| १२ | २८/१०/२०२३ | रांगोळी काढणे. | रंगाची ओळख, भारतीय संस्कारांची ओळख. |
| १३ | ३०/१०/२०२३ | झेंडा बनविणे. | झेंडा बनविण्याचे कौशल्य प्राप्त झाले. झेंड्याविषयी मनात अभिमान निर्माण झाला. |
| १४ | ०७/११/२०२३ | दिवाळी सण साजरा. | भारतीय संस्कृतीतील सर्वात मोठा व लोकप्रिय सण एकत्र व आनंदात साजरा करण्याचे संस्कार झाले. |

## ६) नवोपक्रमाची प्रत्यक्ष कार्यवाही

आदर्श नागरिक हा आपल्या समाजाची शोभा आणि आधार आहेत त्यांच्यात अनेक गुण असतात म्हणूनच त्यांचे जीवन आणि आचरण अनुकरणीय मानले जाते. त्यांचा सर्वांनाच अभिमान वाटतो आदर्श नागरिक देशाला शक्ती संपन्न ,सुखी, शांत आणि संघटित बनवतात .महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, नेताजी सुभाषचंद्र बोस, लाला लजपतराय ,भगतसिंग इत्यादी देशाचे खरे आदर्श नागरिक होते त्यांनी देशासाठी आपले प्राणही अर्पण केले .आज त्यांच्यामुळेच आपण स्वतंत्र आहोत .एक आदर्श नागरिक स्वेच्छेने शिस्तीचे पालन करतो ,कायदे पाळतो ,देशाला हानी पोहोचेल असे कोणतेही काम करत नाही ते इतरांना मदत करतात ज्यामुळे समाज आणखीन चांगला सुसंस्कृत ,समृद्ध आणि सुखी बनू शकतो हेच सर्व गुण बालकांमध्ये यावेत व ते देशाचे आदर्श नागरिक घडावेत म्हणून शाळेमध्ये सद्यस्थितीत भारत केंद्रेत आदर्श नागरिक घडवण्यासाठी संस्कारांची आवश्यकता आणि त्यासाठी शाळेचे योगदान हे उपक्रम घेण्यात आले त्यातील काही उपक्रमांचे थोडक्यात अहवाल पुढील प्रमाणे,

- **सेवा भारती संचालित माधव शिशु मंदिर मध्ये मदत करणे हा उपक्रम घेण्यात आले.**

मदत करणे या उपक्रमांतर्गत बालकांकडून एक छोटेसे सादरीकरण करून घेण्यात आले या नाटकामध्ये एक आजीबाई रस्त्यावरून चालत असते खूप उन्हामुळे तिला चक्कर येते आजीबाईंना चक्कर येते त्याच वेळेत काही मुले तिथे खेळत असतात ते पाहून सर्व मुले आजीबाईंकडे मदतीसाठी धावून जातात व त्यांची काळजीपूर्वक चौकशी करून त्यांना मदत करतात हा उपक्रम घेण्याचा मुख्य उद्देश म्हणजे आज काल धावपळीच्या जीवनामध्ये वृद्ध लोकांकडे फारसे कोणाचेही लक्ष नाही त्याचबरोबर गरजू लोकांना मदत करण्याची भावना लोकांमधून कमी होत आहे अजून काही काळ जर असेच सुरू राहिले तर येणाऱ्या भावी पिढीला याचे दुष्परिणाम भोगावे लागतील म्हणून लहान वयापासूनच मदत करण्याची भावना बालकांमध्ये निर्माण व्हावी या दृष्टीने शाळेमध्ये हा उपक्रम राबवण्यात आला उपक्रम प्रमुख म्हणून अस्मिता ठिकणे यांनी काम पाहिले तसेच राधा जाधव, निलम मुसळे, शुभदा पवार, व रेश्मा शिंदे यांचे सहकार्य लाभले.

**लिंक :-** https://youtu.be/U0BQmJX0fgw?si=GF9YWncWX2IIcNfu

- **सेवाभारती संचलित माधव शिशु मंदिर, इचलकरंजी मध्ये चंद्रयान 3 उपक्रम घेण्यात आले.**

23 ऑगस्ट 2023 रोजी भारतीय अवकाश संस्था (इस्रो) ने चंद्रयान 3 मोहीम यशस्वीपणे पार पाडले. या मोहिमेमुळे भारत चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणारा पहिला देश म्हणून ओळखला जाऊ लागला . चंद्रयान 3 ही भारताची तिसरी चंद्र मोहीम असून या मोहिमेचे उद्दिष्ट चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर लँडिंग करणे , प्रज्ञान रोवरचा वापर करून चंद्राच्या पृष्ठभागाचा शोध घेणे आणि चंद्राच्या पृष्ठभागावरील पाणी व हवेच्या उपस्थितीचा शोध घेणे हे होते या मोहिमेमुळे भारताने अंतराळ संशोधनातील आपल्या कौशल्याची आणि क्षमतांची पुन्हा एकदा सिद्धता केली यामुळे भारताला अंतराळ संशोधनातील एक आघाडीचा देश म्हणून ओळखले जाऊ लागले आहे.

आपल्या भारत देशाच्या या यशाचा अभिमान सर्वच भारतीयांना असायला हवे म्हणून शाळेमध्ये चंद्रयान 3 मोहिमेचे प्रात्यक्षिक चंद्रयानाची प्रतिकृती तयार करून घेण्यात आले या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन जागृत झाले त्याचबरोबर बालवयापासूनच देशभक्ती ही जागृत झाली.

या उपक्रमासाठी चंद्रयानाची प्रतिकृती सौ राधा मारुती जाधव यांनी बनवली. व उपक्रम प्रमुख म्हणून अस्मिता ठिकणे यांनी काम पाहिले मुख्याध्यापकांचे मार्गदर्शन व शिक्षकांच्या सहकार्याने चंद्रयान 3 हे उपक्रम यशस्वीरित्या पार पडले.

**लिंक :-** https://youtu.be/Wykx0z0z0qQ?si=Uf0B0lm0dcdY_eBP

- **सेवा भारती संचालित माधव शिशु मंदिर मध्ये रक्षाबंधन हा सण मोठा उत्साहात संपन्न.**

रक्षाबंधन हा भारतातील एक लोकप्रिय सण आहे. हा सण श्रावण महिन्यातील पौर्णिमेला साजरा केला जातो. या सणाला रक्षाबंधन किंवा नारळी पौर्णिमा असेही म्हणतात. रक्षाबंधन हा बहीण भावाच्या पवित्र बंधनाचा सण आहे. रक्षा म्हणजे रक्षण आणि बंधन म्हणजे धागा अर्थात रक्षणाचा पवित्र धागा म्हणजे रक्षाबंधन

ज्याप्रमाणे भाऊ आपला बहिणीचे रक्षण करतो त्याचप्रमाणे समाजामध्ये आपल्या सर्वांचे रक्षण करणारे डॉक्टर आहेत, पोलीस आहेत, सामाजिक कार्यकर्ते आहेत,यांच्या विषयी प्रेम व आपुलकी व्यक्त

करण्यासाठी आम्ही सेवा भारती संचलित माधव शिशु मंदिर मध्ये यांच्यासोबत रक्षाबंधन हा सण साजरा केला. आम्ही शाळेमध्ये डॉक्टर व पोलीस यांना रक्षाबंधन कार्यक्रमासाठी आमंत्रित केले व सर्व विद्यार्थ्यांना यांच्या कार्याविषयी माहिती सांगितली व त्यानंतर डॉक्टर व पोलीस यांना राखी बांधून रक्षाबंधनाचा सण साजरा केला. यामुळे पोलीस व डॉक्टर यांच्याकडे पाहण्याचा मुलांचा दृष्टिकोन बदलला पूर्वी मुले पोलीस व डॉक्टर यांना घाबरत होते पण रक्षाबंधनानंतर त्यांच्या हे लक्षात आले की पोलीस व डॉक्टर हे आपल्या रक्षणासाठी आहेत . त्यांना घाबरायचे नसते पोलीस व डॉक्टर हेही आपले मित्र आहेत.

- **सेवा भारती संचालित माधव शिशु मंदिर मध्ये गणेशोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न.**

गणेशोत्सव भारतातील एक लोकप्रिय सण आहे हा उत्सव गणपतीचा जन्मदिवस म्हणून सर्वत्र मोठ्याउत्साहाने व आनंदाने साजरा केला जातो. गणेशोत्सवाची सुरुवात गणेश चतुर्थीने होते या दिवशी घरी किंवा सार्वजनिक ठिकाणी गणपतीच्या मूर्तीची स्थापना केली जाते. गणेश चतुर्थीला सर्वत्र भक्तिमय वातावरण असते. गणेश चतुर्थीच्या सणाला कोणतेही जात ,धर्म, पंथ असा भेदभाव न करता भारतातील सर्व लोक एकत्र येतात व हा उत्सव साजरा करतात म्हणून लहान वयापासूनच बालकांच्यावर एकत्र राहण्याचे व समाजामध्ये सुसंस्कृतपणे वागण्याचे संस्कार व्हावेत या दृष्टिकोनातून शाळेमध्ये गणेशोत्सव मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला .

गणेशोत्सव कार्यक्रमांतर्गत मुलांकडून फुलांच्या माळा तयार करणे हा उपक्रम घेण्यात आला यातून बालकांचे हस्त नेत्र समन्वय साधले गेले त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळाला त्यानंतर दुर्वा निवडणे हा उपक्रम घेण्यात आला या उपक्रमातून बालकांना दुर्वा कसे निवडावे हे समजले. त्याचबरोबर त्यांचे हस्त नेत्र समन्वय साधले गेले त्यानंतर मोदक करणे हा उपक्रम घेण्यात आला. *मोदक करणे हा उपक्रम वेगळ्या पद्धतीने घेण्यात आला म्हणजेच मोदकासाठी राळ्याचे पीठ, गुळ , वेलदोडे, दूध व शेंगदाणे इत्यादी पौष्टिक साहित्य वापरले व पौष्टिक मोदक बालकांनी स्वतः बनवले व स्वतः खाल्ले. स्वतः बनवून खाण्याचा एक अनोखा आनंद बालकांना यातून मिळाला* . हे सर्व बनवून झाल्यानंतर गणपतीची सजावट बालकांकडून करून घेण्यात आली .गणपतीच्या आरतीचे पाठांतर ही सर्व मुलांकडून करून घेण्यात आले .ही सर्व तयारी मुलांकडून करून घेतल्यानंतर 18 सप्टेंबर 2023 रोजी शाळेमध्ये भारतीय परंपरेनुसार गणेशोत्सव साजरा करण्यात आला यामध्ये माती पासून बनवलेली गणेशाची मूर्ती स्थापन केली त्याचबरोबर भजन व वाद्यांच्या गजरात गणेशाचे आगमन शाळेमध्ये करण्यात आले त्यानंतर शाळेतील झाडांचे पूजन करून गौरी पूजन करण्यात आले सर्व मुलींनी गौरीचे खेळ खेळले यातून मुलींचा भरपूर शारीरिक विकास झाला व भारतीय संस्कृतीनुसार गौरीच्या खेळांची ओळख झाली अशा पद्धतीने शाळेमध्ये गणेशोत्सव साजरा करण्यात आला

19 सप्टेंबर 2023 पासून गणेश उत्सवाची सुरुवात होणार आहे तरी ,मुलांनी ही सर्व कामे स्वतःच्या घरीं करावे , गणेशोत्सवासाठी आईला मदत करावे व घरातील सणांमध्ये बालकांचा सहभाग असावा . हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

उपक्रम प्रमुख म्हणून सौ. अस्मिता ठिकणे यांनी काम पाहिले त्याचबरोबर राधा जाधव ,निलम मुसळे शुभदा पोवार ,रेश्मा शिंदे या सर्वांचे सहकार्य लाभले व उपक्रम यशस्वीपणे पार पडला.

**लिंक :-** https://youtu.be/-NeZAIn५KIg?si=jXQSVot2ia2cmvIY

- **सेवा भारती संचलित माधव शिशुमंदिर , इचलकरंजी मध्ये स्वच्छता दिन उत्साहात संपन्न.**

सेवा भारती संचलित माधव शिशु मंदिर मध्ये आज मंगळवार दिनांक 3 ऑक्टोंबर 2023 रोजी स्वच्छता दिन साजरा करण्यात आला.

स्वच्छता हा आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे .स्वच्छता म्हणजे आपले शरीर ,मन व परिसर स्वच्छ ठेवणे .स्वच्छता ही एक चांगली सवय आहे जी आपल्या जीवनाची गुणवत्ता वाढवते. आपल्यासाठी पाणी व अन्न जसे महत्त्वाचे आहे तशी स्वच्छता महत्त्वाची आहे .असे म्हणतात की, जिथे स्वच्छता नांदते ,तेथे देवही नांदतो.म्हणूनचआपणआपल्या शाळेच्या वतीने स्वच्छता बांधवांचे खूप खूप आभार मानण्यासाठी त्यांच्या सत्काराचे कार्यक्रम आयोजित केले. या कार्यक्रम प्रसंगी स्वच्छता बांधवांचे मुकादम मा.श्री .प्रकाश गायकवाड यांचे शाळेचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मा श्री पांडूरंग धोंडपुडे सर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन व शाळेचे संचालक मा श्री प्रकाश गणपुले सर यांच्या हस्ते भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला त्याचबरोबर मुख्याध्यापिका मा.सौ स्वाती शिंदे मॅडम यांच्या हस्ते स्वच्छता भगिनींना भेटवस्तू देऊन त्यांचे सत्कार करण्यात आले त्याचबरोबर त्यांच्या या स्वच्छता कामाबद्दल विभाग प्रमुख सौ ठिकणे मॅडम यांनी आभार मानले .

आपल्या आजूबाजूला समाजामध्ये अनेक लोक चांगले काम करतात ज्यामुळे समाजाची व देशाची सेवा होते अशा सर्व लोकांचे आभार मानण्याची भावना लहानपणापासूनच मुलांच्या मनात निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य हेतू होता. कार्यक्रम प्रमुख म्हणून सौ. अस्मिता ठिकणे मॅडम यांनी काम पाहिले . राधा जाधव मॅडम निलम मुसळे मॅडम ,शुभदा पोवार मॅडम व रेश्माशिंदे मॅडम यांच्या सहकार्याने कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडला.

**लिंक :-** https://youtu.be/bghTm038U3o?si=6ZAiPiXQQyZWJ7UM

https://youtu.be/dcybFts2YpM?si=hHVfk61i१४7mVkh1

- **सेवा भारती संचालित माधव शिशु मंदिर मध्ये टपाल दिन उत्साहात संपन्न.**

ज्याप्रमाणे सफाई कामगार, पेपरवाला, दूधवाला आपली कामे नियमित करतो त्याचप्रमाणे पोस्टमन ही समाजामध्ये जनसेवकाची भूमिका बजावतो .पोस्टमन घरोघरी जाऊन मनीऑर्डर, पत्र ,पार्सल, रजिस्टर कार्ड वाटप करतो पोस्टमन हा डाक व तार विभागातील एक सरकारी कर्मचारी आहे. त्याचे काम खूपच महत्त्वाचे असते. एक कर्तव्य तत्पर पोस्टमन प्रत्येक पत्र त्याच्या पत्त्यावर घरी नेऊन देतो नूतन वर्ष व परीक्षेच्या निकालासाठी तर सर्वजण पोस्टमनची वाट पाहत असतात .सीमेवर रक्षण करणाऱ्या सैनिकांसाठी तर पोस्टमन हा देवदूतच असतो अशा या पोस्टमनची ओळख बालकांना व्हावी म्हणून पोस्ट व पोस्टमनची ओळख हे एक कृतीयुक्त नाट्यीकरण बालकांकडून करून घेण्यात आले व टपाल दिन शाळेमध्ये साजरा करण्यात आला.

**लिंक :-** https://youtu.be/Mjt7sazd-jw?si=9nbWwjk2FOCpe6wi

- **सेवा भारती संचालित माधव विद्यामंदिर मध्ये दिवाळी हा सण उत्साहात साजरा करण्यात आला.**

मंगळवार दिनांक 7 नोव्हेंबर 2023 रोजी माधव विद्यामंदिर मध्ये दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दिवाळी हा भारतीय संस्कृतीतील सर्वात मोठा सण आहे. दिवाळी या सणाला दीपावली असेही म्हणतात हा सण दरवर्षी ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात साजरा केला जातो दिवाळी हा सण प्रकाशाचा आहे दिवाळीला सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण असते. दिवाळी सणाची सुरुवात धनत्रयोदशीपासून भाऊबीज पर्यंत पाच दिवस असते. शाळेमध्ये वसुबारस, धन्वंतरी पूजन ,लक्ष्मीपूजन, पाडवा व भाऊबीज हे पाचही दिवस साजरे करण्यात आले.

